# MARATHI

## Standard I

### TEACHER'S GUIDE

मराठी इयत्ता पहिली

शिक्षकांसाठी

हस्तपुस्तिका

MAHATMA GANDHI INSTITUTE
In collaboration with
MINISTRY OF EDUCATION & HUMAN RESOURCES, TERTIARY EDUCATION AND SCIENTIFIC RESEARCH
Republic of Mauritius
2016

# *Panel Members*

| | |
|---|---|
| Dr. B. Abba | Co ordinator,<br>Senior Lecturer<br>Mahatma Gandhi Institute |
| Mrs. P. Gopala | Senior Supervisor<br>*Mins of Edu & H.R* |
| Mrs. R. Babajee | DHT *(Mins of Edu & H.R)* |
| Mr. R. Gunnoo | T/ST *(Mins of Edu & H.R)* |


***Acknowledgements***

Mahatma Gandhi Institute
Mr. R.Gunnoo *Word Processor*
Miss. J. Sakoo *Graphic Artist*

# दोन शब्द

शिक्षक मित्रहो,

इयत्ता पहिलीच्या मुलांना शिकविणे हे एक आव्हानच आहे. या मुलांना ज्ञानाचा पहिला धडा शिकविण्याचा बहुमान तुम्हा शिक्षकांना मिळत आहे. तेव्हा हे कार्य शिक्षकांनी खुबीने, जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे पार पाडले पाहिजे.

पहिल्या इयत्तेतील मुलांजवळ ज्ञान संपादन करण्याची कौशल्ये असतात. क्षमताही असते. पण मुलांना जर का चुकीचे शिकविले, चुकीचे मार्गदर्शन दिले तर ती मुले त्याच प्रकारचे शिक्षण ग्रहण करतील.

अनुभवाच्या आधारे आपण हे सांगत आहोत की सहा वर्षांच्या शिक्षणानंतरही मुलांना मराठीतून दोन शब्दांपासून वाक्यरचना करता येत नाही. अस्खलितपणे वाचन करता येत नाही. अपेक्षित शब्दसंपत्ती नसते. निबंध लेखन नीट जमत नाही. उच्चारासंबंधी दोष दिसून येतो. तेव्हा मुलांचा सर्वांगीण भाषिक विकास व्हावा या दृष्टीकोणातून ही हस्तपुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. संभाषण, वाचन व लेखन ह्या भाषाशिक्षणासाठी आवश्यक कौशल्ये मुले संपादन करू शकतील अशा प्रकारच्या व्यवसायांची योजना या पुस्तकात करण्यात आलेली आहे.

मुलांना बोलते करण्यासाठी सहज सोपी बालगीते, अभिनय गीते अवश्य शिकावीत. शब्दसंपत्ती वाढविण्यच्या दृष्टीकोणाने आवश्यक निर्देश व सूचना देण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त ***CD*** वर उपलब्ध छोटी कथा ऐकायला दिली तर मुलांचा भाषिक विकास अवश्य होईल.

या वर्षी महात्मा गांधी संस्थेच्या मराठी विभागाने प्राथमिक व माध्यमिक शाळांतील मुलांसाठी बालगीतांची एक ***CD*** काढली आहे. त्या ***CD*** मधून पहिल्या वर्गातील मुलांसाठी एकूण तीन गीते निवडण्यात आलेली आहे. ती गाणी मुलांपर्यंत अवश्य पोहोचवावीत. मुलांच्या भाषिक कौशल्याचा विकास होईल. इंस्पेक्टोरोट किंवा ***MGI*** च्या मराठी विभागाशी संपर्क साधून ***CD*** अवश्य मिळवून घ्यावी.

अध्ययन अध्यापनासाठी आपल्या वर्गात आनंदी वातावरणाची निर्मिती करून मुलांना लाडीगोडीने शिकविले तर आपली मुले तुम्हा शिक्षकांच्या अथक परिश्रमाचे व अनुभवाचे चीज करतील. सदर हस्तपुस्तिकेचा अवश्य लाभ घ्यावा.

मराठी पाठ्यपुस्तक समिति
डॉ. बी. आबा

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | माझा परिचय | ५ |
| २. | माझा वर्ग | ७ |
| ३. | माझी शाळा | ९ |
| ४. | माझे अवयव | १२ |
| ५. | माझे कुटुंब | १५ |
| ६. | रंग | १७ |
| ७. | भाज्या | २१ |
| ८. | फळे | २३ |
| ९. | जनावरे | २५ |
| १०. | पक्षी | २८ |
| ११. | पाणी | ३१ |
| १२. | अंक | ३४ |
| १३. | हवामान | ३८ |
| १४. | फुलबाग | ४० |
| १५. | न्याहारी | ४३ |
| १६. | चित्रवाचन | ४५ |
| १७. | वाढदिवस | ४७ |

## घटक १ ला: माझा परिचय

**साध्य:**

मुले स्वतःची ओळख करून देऊ शकतील.
त्यांना वर्गातील मित्रमैत्रिणींची ओळख होईल.
ती वर्गातील मुलांना त्यांच्या नावांनी हाका मारायला शिकतील.
मी, तू, तो, ती, व आम्ही या शब्दांची ओळख त्यांना होईल.

**शैक्षणिक-साधने:**

गणवेषात असलेल्या एका मुलाला अथवा मुलीला वर्गासमोर उभे करून प्रश्न विचारावेत.

**शब्दसंग्रह:**

गुरुजी, बाई, मी, तू, तो, ती, आम्ही, कोण ?, काय ?, नाव, गावाचे नाव, वय, नमस्कार, मुलगा, मुलगी

**वाक्यरचना:**

मुलांनो, नमस्कार. मी ............ आहे.
माझे नाव ............ आहे.
मी ............ ला राहतो / राहते.
तू ............ आहेस. तुझे नाव ............ आहे.
तुझे वय ............ आहे.
तू एक मुलगा / मुलगी आहेस.

**अध्यापन:** शैक्षणिक साधन म्हणून आणलेल्या चित्रातील मुलाला सूचना अथवा मुलीला एखादे काल्पनिक नाव देऊन त्याची / तिची ओळख करून द्यावी. मग स्वतःची ओळख करून द्यावी. नंतर वर्गातील प्रत्येक मुलाला अनुक्रमे त्याचे नाव, वय व राहण्याचे ठिकाण विचारावे. मुले बोलू लागल्यावर प्रश्न विचारून त्यांना आपल्या मित्रमैत्रिणींची नावे वगैरे सांगावयास लावावीत. वर दिलेल्या शब्दसंग्राहाचा प्रयोग आपल्या अध्यापनात करून घ्यावा. मुले बोलत असता त्यांच्या उच्चारांकडे योग्य लक्ष पुरवावे.

**अन्य उपक्रम:** परिचयासाठी दिलेले ............ ''आहे नाव माझे '' हे बडबड गीत मुलांना शिकवून ते त्यांना पाठ करावयास लावावे.

## बडबड गीत

............ असे नाव माझे
वय वर्षे ............ माझे
आईबाबांचा/ ची मुलगा/मुलगी
शाळेत शिकायला येतो/येते मी..१

मित्र/मैत्रिणी ............ मला
शाळेमध्ये खेळायला
वर्गात आम्ही शांत बसतो
बडबड गीते आम्ही गातो..२

## घटक २ रा: माझा वर्ग

**साध्य:** मुलांना वर्गातील वस्तूंची ओळख होईल.
त्यांना त्या वस्तूंची नावे माहीत होतील.
वर्गातील वस्तू आणि त्यांचा उपयोग यांबद्दलचे ज्ञान त्यांना मिळेल.

**शै.साधने:** पाठाला पुरक ठरतील म्हणून वर्गातील वस्तू दाखवावे.

**शब्दसंग्रह:** वर्ग, पाटी, लेखणी, पुस्तक, वही, पेन्सिल, दप्तर, मेज, फळा, खुर्ची, खडू, पुसणे, कपाट, कचरापेटी, पट्‌टी, चित्रे, बाटली, दार, खिडकी, पडदा.

**वाक्यरचना:** हा वर्ग आहे. हा आमचा वर्ग आहे. आमचा वर्ग मोठा /लहान आहे. वर्गात फळा आहे. फळा काळा / पांढरा आहे. ही खुर्ची आहे. ही माझी / गुरुजींची / बाईंची खुर्ची आहे. ही पाटी आहे. पाटी काळी आहे. हा खडू आहे. हे दप्तर आहे.

**अ. सूचना:** वर्गातील वस्तूंवरून मुलांना पाठ परिचय करून द्यावा. वर्गात दिसत असलेल्या प्रत्येक वस्तूची ओळख करून देऊन वर्गातील सर्व मुलांना आळीपाळीने प्रश्न विचारून त्या वस्तूंची नावे सांगावयास लावावीत. नंतर वर्गातील एकामागून एक अशी वस्तू दाखवून मुलांना प्रश्न विचारावेत. हे काय आहे ? हा / ही / हे ............ आहे. असे उत्तर द्यावे. पुढे प्रश्नाचे स्वरूप बदलून मुलांना विचारावे. हा / ही / हे ............ आहे काय ? मुलांनी उत्तर द्यावे. होय / नाही. हा / ही / हे ............ आहे / नाही. पाठ घेत असता शिक्षकाने मुलांना वर्गातल्या वस्तूंच्या उपयोगाबद्दल माहिती द्यावी. उदा. खडूने फळ्यावर लिहितात. लेखणीने पाटीवर लिहितात. पेन्सिलीने वहीत लिहितात. इत्यादी.

**अन्य-उपक्रम:** मुलांना टिंबे जोडून वस्तूंचे आकार गिरवावयास लावावे.

पाठात आलेल्या वस्तूंची कात्रणे मिळवून आणावयास मुलांना उत्तेजित करावे. मुलांना दिलेल्या वस्तूंची अपूर्ण चित्रे पूर्ण करावयास लावावीत.

## घटक ३ रा: माझी शाळा

**साध्य:** मुलांना शाळेविषयी माहिती मिळेल.
त्यांना शाळेतील माणसांची त्यांच्या कार्यपरत्वे ओळख होईल.
त्यांना शाळेतील वस्तूंचा व शाळेच्या परिसराचा परिचय होईल.
ती शाळेशी निगडित असलेला शब्दसंग्रह जाणतील.

**शैक्षणिक-साधने:** मुले शाळेच्या आवारात खेळतानाचे चित्र मिळवावे.
वर्गात शिक्षक काम करीत असतानाचे चित्र मिळवावे.

**शब्दसंग्रह:** शाळा, वर्ग, फळा, खडू, मेज, खुर्ची, दार, खिडकी, आवार, झेंडा, मोठी, सुंदर, छान, मुख्यगुरूजी, गुरूजी, बाई, मुले, फुलझाडे, झाडे, नळ, मोटार, सायकल, कचरापेटी.
धावणे, बसणे, चालणे, खेळणे, हसणे, रडणे, ओरडणे

**वाक्यरचना:** ही शाळा आहे. शाळा मोठी आहे. शाळा सुंदर आहे. गुरूजी / बाई शाळेत शिकवतात. मुले शाळेत शिकतात. मुले आवारात खेळतात. शाळेच्या आवारात झेंडा आहे. झेंडा चार रंगांचा आहे.

| | |
|---|---|
| **अ.सूचना:** | शाळेचे चित्र दाखवून पाठाची प्रस्तावना करावी. नंतर अनुक्रमे पुस्तकातील व शैक्षणिक साधन म्हणून आणलेली चित्रे दाखवून त्यांवर चर्चा करावी. शाळेतील व्यक्तींची त्यांच्या कार्यपरत्वे ओळख करून द्यावी.<br>पाठाशी निगडित दिलेले बडबड गीत मुलांना शिकवून म्हणायला लावीत असता त्यांच्या उच्चारांकडे योग्य लक्ष पुरवावे. |
| **अन्य-उपक्रम:** | मुलांना शाळेच्या परिसराचे नीट निरीक्षण करता यावे म्हणून थोडा वेळ त्यांना बाहेर मोकळ्या हवेत घेऊन जावे.<br>पाठ समजावीत असता शिकवलेले शब्द वापरून मुलांना विचारले ल्या वस्तूंची नावे सांगावयास लावावीत व कृति करावयास लावावीत. |

## आमची शाळा

छान आमची शाळा
नवी आमची शाळा
रंग तिचा निळा निळा
सुंदर आमची शाळा...१

छान आमची शाळा
नवी आमची शाळा
लिहावयास नवा फळा
पांढरा पांढरा फळा...२

छान आमची शाळा
नवी आमची शाळा
बाजूला छोटा मळा
हिरवा हिरवा मळा...३

## घटक ४ था: माझे अवयव

**साध्य:** मुलांना अवयवांची नावे माहीत होतील.
ते अवयव दाखवून त्यांची नावे सांगू शकतील.
आपल्या अवयवांच्या उपयोगाबद्दल त्यांना कल्पना येईल
ती आपले शरीर स्वच्छ ठेऊन त्याची काळजी घेण्यास
शिकतील.

**शैक्षणिक - साधने:** अवयव हा घटक यशस्वी रीत्या शिकवण्याकरिता
त्याच्याशी संबंधित एखादे आकर्षक चित्र मिळवावे.

**शब्दसंग्रह:** हात, पाय, कान, गाल, नाक, कपाळ, तोंड, पोट, बोट
नख, दात, छाती, डोळा, पाठ, डोके, केस, गळा, ओठ,
हनुवटी
माझा, माझी, माझे
घासणे, धुणे, पुसणे, कापणे, विंचरणे

**वाक्यरचना** **:**हा माझा हात / पाय आहे.
हे माझे हात / पाय आहेत.
हा माझा गाल / कान आहे.
हे माझे गाल / कान आहेत.

ही माझी छाती / हनुवटी आहे.
हे माझे पोट / डोके आहे.

मी दात घासतो / घासते.
मी हात धुतो / धुते.
मी हात पुसतो / पुसते.
मी नखे कापतो / कापते.
मी केस विंचरतो / विंचरते.

**अध्यापन सूचना:** शैक्षणिक साधन म्हणून सुचवलेल्या अवयवांचे आकर्षक चित्र दाखवून शिक्षकाने अवयवांची नावे सांगून त्यांची ओळख करून द्यावी. नंतर ती नावे मुलांकडून म्हणवून घ्यावी. पुढे शिक्षकाने आपले अवयव दाखवून हा, ही, हे, माझा, माझी, माझे ............ आहे / आहेत.
अशी चार शब्दांची पूर्ण वाक्ये उच्चारून अवयवांवर भर द्यावा. मुलांना आपापल्या अंगाचे भाग दाखवून त्यांची नावे सांगावयास लावावीत. अंग स्वच्छ ठेवण्यासाठी मुलांना पुढील कृति वाक्यांच्या रूपात सांगावयास लावावीत.
उदा... मी दात घासते / घासतो.
पुढे होय व नाही ह्या शब्दांचा प्रयोग करण्याच्या हेतुने आपल्या घटकाशी निगडित प्रश्न विचारून त्यांची पूर्ण

वाक्यात उत्तरे स्वीकारावीत. पाठ घेत असता आपल्या अवयवांच्या उपयोगांविषयी मुलांना माहिती द्यावी.

**अन्य उपक्रम:**

मुलांना कागदावर आपल्या हाताचा आकार काढाव-यास लावून त्यांना बोटांची नावे शिकवावीत.

टिंबे जोडून निरनिराळ्या अवयवांचे आकार पूर्ण करावयाचा मुलांना सराव द्यावा.

मुलांना आपल्या उजव्या नि डाव्या अंगठ्यांनी निरनिराळ्या रंगांचे ठसे कागदावर उमटून घ्यावयास लावावे.

मुलांना आपले हात रंगात भिजवून त्यांच्याकडून पांढऱ्या कागदांवर त्यांचे ठसे उमटवून घ्यावे.

या कृतीवरून ती उजवा नि डावा हे शब्द शिकतील.

माझे अवयव

एक दोन एक दोन　　डोळे दोन कान दोन
तीन चार तीन चार　　हात नि पाय झालेत चार
पाच सहा पाच सहा　　नाक गाल ओठ पहा
सात आठ सात आठ　　पुढे पोट मागे पाठ
नऊ दहा नऊ दहा　　बोटे हातांची मोजून पहा

## घटक ५ वा: माझे कुटुंब

**साध्य:** मुलांना कुटुंब म्हणजे काय ते कळेल.
ती कुटुंबियांमधील नाती जाणतील.
त्यांच्या मनात कुटुंबियांबद्दल आदर व प्रेमभाव निर्माण होईल.
ती कुटुंब या घटकाशी संबंधित असलेला शब्दसंग्रह जाणतील.

**शैक्षणिक साधने:** वर्तमानपत्रातील अथवा मासिकांतील आदर्श कुटुंबांची कात्रणे मिळवावीत. लहान कुटुंब आणि मोठे कुटुंब असलेले एक चित्र मिळवावे.

**शब्दसंग्रह** :आई, बाबा, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी, आजी, आजा, आजोबा, नातू, नात, दादा, ताई, बाळ

**वाक्यरचना** :हा अभय आहे. ही अभयची आई आहे. हे अभयचे बाबा आहेत. ही अभयची आजी आहे. हे अभयचे आजोबा आहेत. हा अभयचा भाऊ आहे. ही अभयची बहीण आहे. अभय हा ...........चा भाऊ / मुलगा / नातू आहे. ........... ही ...........ची बहीण / मुलगी / नात आहे.

**अध्यापन सूचना:** आदर्श नि नीटनेटके अशा कुटुंबाचे चित्र दाखवून पाठ परिचय करून द्यावा. आई, वडील, भाऊ, बहीण, आजी व आजोबा यांच्यामधील नाती मुलांच्या लक्षात आणून द्यावीत. उदा. अभय हा ............चा भाऊ आहे.
............ ही आजोबांची नात आहे. चित्रांच्या आधारे मुलांच्या लक्षात अपेक्षित नाती आणून दिल्यावर त्यांच्या घरी कोण कोण आहेत असा प्रश्न वर्गातील प्रत्येक मुलाला विचारावा. नंतर तू आपल्या आईचा / ची कोण आहेस ? असा प्रश्न विचारून मुलांना बोलके करावे. आई - बाबा, आजोबा - आजी, भाऊ - बहीण, मुलगा - मुलगी, या शब्दांचा प्रयोग अध्यापनाच्या वेळेस येऊ द्यावा. म्हणजे मुलांच्या मनात लवकरच ते बिंबवले जातील.

**अन्य उपक्रम:** मुलांना स्त्री - पुरूषांची कात्रणे जमवावयास लावावीत.
मुलांना आपापल्या कुटुंबाचे चित्र रेखाटावयास लावावे.

## घटक ६ वा: रंग

**साध्य:** मुलांना रंगाची ओळख होऊन ती त्यांची नावे जाणतील.
ती निरनिराळ्या वस्तूंचे रंग सांगू शकतील.
ती योग्य रंगाचा वापर करायला शिकतील.

**शैक्षणिक साधने:** लाल, निळा, पिवळा व हिरवा ह्या रंगांच्या वस्तूंची कात्रणे मिळवावीत. फुलदाणीत निरनिराळ्या रंगांची फुले असलेले एखादे चित्र मिळवावे. रंगीत पेन्सिली किंवा रंगीत खडू ही वापरावे.

**शब्दसंग्रह:** लाल, निळा, पिवळा, हिरवा, नारिंगी, गुलाबी, काळा, पांढरा, फुगा, चेंडू, सदरा, झगा, फूल, कप, दप्तर, टोपी, टोपली.

**वाक्यरचना:** हा फुगा लाल / निळा / पिवळा / हिरवा आहे.
फळा काळा / पांढरा आहे.
नारिंग नारिंगी आहे.
सदरा / झगा / परकर ............ आहे.
हा कप आहे. हा कप निळा आहे. निळा कप सुंदर आहे.

**अध्यापन सूचना:** चित्रातील एकेक फुगा दाखवून " हा फुगा ............ आहे." असे म्हणून लाल, निळा, पिवळा, हिरवा या चार रंगांची ओळख करून द्यावी. हे चार रंग मुलांच्या ध्यानात पक्के राहावे म्हणून आपल्या चौरंग्याचा आधार घेतल्यास पाठ परिणामकारक होईल. तसेच शैक्षणिक साधन म्हणून आणलेल्या कात्रणांचा वापर करावा. पुढे नारिंग दाखवून, " नारिंग नारिंगी आहे " व गुलाब दाखवून " गुलाब गुलाबी आहे " असे मुलांना सांगून आपल्या रंगांच्या नावांच्या यादीत नारिंगी व गुलाबी हे दोन रंग जोडावेत.

नंतर शब्दासंग्रहात दिलेल्या इतर शब्दांचा पाठात प्रयोग करावा. रंगांच्या ज्ञानाचे दृढीकरण म्हणून मुलांना मार्गदर्शन करून पुस्तकातील दिलेल्या व्यवसाय करावयास लावावा.

**अन्य उपक्रम:** शिकवलेल्या रंगांच्या ज्ञानाचे आकलन म्हणून मुलांना त्या रंगांच्या वस्तूंची कात्रणे मिळवण्यास सांगावीत.

मुलांना आपापल्या आवडीच्या फळाचे चित्र काढून त्याला योग्य रंग द्यावयास लावावेत.

मुलांना टिंबे जोडून निरनिराळे आकार गिरवून ते रंगविण्यास सांगावे.

***महात्मा गांधी संस्थेने तयार केलेल्या cd च्या आधारे रंगांवर आधारित गीत ऐकायला व गायला सांगावे.***

## विविध रंग

एक चेंडू लाल लाल, टकमक पाही छोटे बाळ
वर खाली खाली वर (२) बघे चेंडू लाल लाल

पिवळे पिवळे फुगे पाहून, करतो गोड गाल रे (२)
हाताने धरताच फुगा त्याचा होतो हाल रे
एक चेंडू लाल लाल, टकमक पाही छोटे बाळ (२)

काळा काळा चष्मा बघून, पळते छोटे बाळ रे (२)
हाताने धरताच चष्मा, त्याला फुटतो घाम् रे
एक चेंडू लाल लाल, टकमक पाही छोटे बाळ (२)

पांढरा पांढरा ससा बघून, हासरे होते बाळ रे (२)
पांढरा ससा पळतो तेव्हा बाल होते बेहाल रे
एक चेंडू लाल लाल, टकमक पाही छोटे बाळ (२)

निळी निळी गाडी पाहून, पटकन हसे बाळ रे (२)
हाताने धरताच गाडी, गाडी पळती धाम रे
एक चेंडू लाल लाल, टकमक पाही छोटे बाळ (२)

हिरवे हिरवे पोपट पाहून, बेचैन होते बाळ रे (२)
विठ्ठू विठ्ठू बोलते तेव्हा, खुश होते बाळ रे
एक चेंडू लाल लाल, टकमक पाही छोटे बाळ (२)

## घटक ७ वा : भाज्या

**साध्य :** मुलांना भाज्यांची ओळख होईल.
ती भाज्यांची नावे जाणतील.
त्यांना भाज्यांच्या आकारांचे व रंगांचे ज्ञान होईल.
त्यांना भाज्या या घटकासंबंधीचा शब्दसंग्रह मिळेल.

**शै. साधने :** पुस्तकात दिलेल्या भाज्यांच्या चित्रांव्यतिरिक्त इतर भाज्यांची आकर्षक चित्रे जमवावीत. घरी सहज रीत्या मिळण्याजोग्या एक दोन छोट्या भाज्या जमवाव्यात.

**शब्दसंग्रह :** टमाटर, कोबी, फुलकोबी, गाजर, बटाटा, मुळा, भोपळा, वांगे, भेंडे, घेवडा, पडवळ, घोसाळे, कारले, दुधीभोपळा
आले, लसूण, कांदा, कोथिंबीर, पुडिना, मिरची

**वाक्यरचना :** हे गाजर आहे. गाजर एक भाजी आहे. गाजर ही भाजी छान आहे. आई बाजाराला जाते. ती ताजी भाजी घेते. आई ताजी भाजी करते. मला भोपळा आवडतो. माझे ओजोबा भाज्या लावतात. त्यांचा मळा हिरवागार आहे.

**अध्यापन सूचना:**

पुस्तकात दिलेल्या भाज्यांच्या चित्रांवरून पाठ परिचय करून द्यावा. नंतर शैक्षणिक साधन म्हणून सुचविलेल्या प्रमाणे सोबत आणलेल्या इतर भाज्यांची चित्रे दाखवून त्यांची ओळख करून द्यावी. मुलांना अपेक्षित भाज्यांची ओळख झाल्यावर एकामागून एक अशा भाजीविषयी चर्चा करावी.

अध्यापनाच्या वेळेस वाक्यरचना म्हणून वर दिलेल्या वाक्यांसारखीच वाक्ये वापरून आपली उद्दिष्टे साधून घ्यावीत.

भाज्यांचे आकार, रंग, चवी व स्वच्छता यांविषयीचे ज्ञान मुलांना होऊन त्यांच्या शब्दसंग्रहात योग्य अशी शब्दांची भर पडेल या दृष्टीकोनाने अध्यापनाचे कार्य करावे.

**अन्य उपक्रम:**

मुलांना टिंबे जोडून भाज्यांची चित्रे पूर्ण करावयास लावावीत. नंतर त्यांना योग्य रंग देऊन त्यांची नावे सांगावयास लावावीत. वर्गातील प्रत्येक मुलाला आपल्या आवडीच्या भाजीचे चित्र काढावयास लावावे अथवा तिचे एखादे कात्रण मिळवून आणावयास लावावे व त्या संबंधी त्या मुलाशी विशिष्ट रीतीने थोडीफार चर्चा करावी.

## घटक ८ वा: फळे

**साध्य:** मुलांना फळांची ओळख होईल.
त्यांना फळांचे आकार, रंग व चवी यांविषयी माहिती मिळेल.
त्यांना फळांच्या उपयोगांबद्दल माहिती मिळेल.
फळांसंबंधीचा शब्दसंग्रह त्यांच्या शब्दभांडारात पडेल.

**शैक्षणिक** साधने: निरनिराळ्या फळांची आकर्षक चित्रे मिळवावीत. शक्य झाल्यास एक दोन ताजी फळे बरोबर घ्यावीत.

**शब्दसंग्रह:** अननस, आंबा, पपई, केळे, लिची, नारळ, संत्रे, बोर, सफरचंद, नारिंग, किवी, लिंबू, चिंच, द्राक्षे, बोर, कैरी कलिंगड, अंबाडी.

आंबट, गोड, लोणचे

**शब्दसंग्रह:** हा आंबा आहे. ही पपई आहे. हे केळे आहे. आंबा एक फळ आहे. आंबा झाडावर लागतो. पिकलेली पपई गोड असते. चिंच आंबट असते. पेरूचे झाड लहान असते. आंब्याचे झाड मोठे असते. नारळाचे झाड उंच असते. मी नारळाचे पाणी पितो / पिते.

**अ. सूचना** :बरोबर आणलेली ताजी फळे अथवा फळांची आकर्षक चित्रे मुलांना दाखवून पाठ परिचय करून द्यावा. नंतर चित्रांच्या आधारे एकामागून एक अशा फळांची ओळख करून द्यावी. पाठ समजावीत असता फळांचे आकार, रंग, चवी व उपयोग यांबद्दल चर्चा करावी. फळांनी काय काय तयार करतो, त्याची जाणीव मुलांना द्यावी. उदा. मुरंबा, जूस, केक, कोशिंबीर ईत्यादि.....

फळे झाडांवर तशीच वेलींवरही लागतात ही गोष्ट मुलांच्या ध्यानात आणून द्यावी.

आपण देशी आणि परदेशी फळे वापरतो याचा उल्लेख पाठात येऊ द्यावा. परदेशातून आणलेल्या फळांची चित्रे दाखवून मुलांना त्यांची नावे सांगावयास लावावीत.

**अ.उपक्रम:** मुलांना आपल्या आवडत्या फळांचे चित्र काढावयास लावावे.

मुलांना वेगवेगळ्या फळांची नावे सुचवून कागदावर त्यांची चित्रे काढावयास सांगावीत.

नंतर त्या चित्रांना रंग देऊन कातरीने ती नीट कापून घ्यावी. मग ती चित्रे एका फलकावर चिकटवावीत. तो फलक वर्गात लावावा.

मुलांना आंबट नि गोड अशा प्रत्येक चवीच्या फळाचे एकेक चित्र काढून त्याला रंग द्यावयास सांगावे.

## घटक ९ वा:    जनावरे

**साध्य:** मुलांना निरनिराळ्या जनावरांची ओळख होईल.
मुले निरनिराळ्या जनावरांच्या ओरडण्याचे आवाज ओळखतील.
माणसांना जनावरे किती उपयोगी पडतात हे त्यांना कळेल.
मुलांना जनावर या घटकाशी निगडित असलेला शब्दसंग्रह मिळेल.

**शै. साधने:** निरनिराळ्या जनावरांची आकर्षक चित्रे गोळा करावीत. पाळीव आणि रानटी जनावरे यांची वेगवेगळी कात्रणे मिळवावीत.

**शब्दसंग्रह:** बैल, गाय, कुत्रा, मांजर, शेळी, घोडा
माकड, ससा, हरण, वाघ, सिंह, हत्ती इत्यादि

**वाक्यरचना:** हा कुत्रा आहे. कुत्रा एक पाळीव जनावर आहे. हा कुत्रा काळा व पांढरा आहे. ही गाय आहे. गाय गवत खाते. गाय दूध देते. हे माकड आहे. माकड जंगलात राहते. माकड जंगलात फळे खाते.

**अ. सूचना:** पुस्तकात पाठावर आधारित दिलेल्या चित्रांवर चर्चा करून पाठाची प्रस्तावना करावी. वर्गातील प्रत्येक मुलाला जनावरांची चित्रे दाखवून त्यांची नावे सांगावयास लावावीत. पाठ घेत असता पाळीव आणि रानटी जनावरांमधील फरक मुलांच्या लक्षात आणून द्यावा. वर्गात पाठाला पोषक ठरतील अशा आणलेल्या साधनांचा योग्य त्या ठिकाणी वापर करावा. तसेच पाठ घेण्यामागील आपली उद्दिष्टे सहजरीत्या साध्य होतील अशी सुलभ वाक्ये आपल्या बोलण्यात वापरावीत. जनावरांच्या आकाराबद्दल, खाण्यापिण्याबद्दल व आवाजांबद्दलही बोलावे. जनावरांच्या कार्यांबद्दलसुद्धा थोडक्यात बोलावे. काही जनावरे सर्कशीत काम करतात, यांची माहिती मुलांना आवश्य द्यावी. तसेच मुलांच्या मनात जनावरांबद्दल दयेची भावना रूजू करावी.

**अ. उपक्रम:** मुलांना जनावरांची कात्रणे गोळा करून आणावयास सांगावीत.

वर्गात मुलांना जमतील अशा जनावरांच्या नक्कला करून दाखवावयास लावाव्यात.

"कुत्रा म्हणतो भो भो भो " हे बडबड गीत मुलांना अभिनयासह शिकवावे.

# बडबड गीत

| | |
|---|---|
| कुत्रा म्हणतो | भो भो भो |
| मांजर म्हणते | म्याव म्याव |
| कावळा म्हणतो | काव काव काव |
| चिमणी म्हणते | चिव चिव |
| बेडूक म्हणतो | डराव डराव |
| शेळी म्हणते | बें...बें... |
| आई म्हणते | खेळ जरा |
| बेबी म्हणते | घे ग मला |

## घटक १० वा : पक्षी

**साध्य** :मुलांना पक्ष्यांची ओळख होईल.
त्यांना निरनिराळ्या पक्ष्यांची नावे माहीत होतील.
निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज त्यांच्या परिचयाचे होतील.
त्यांना निरनिराळ्या पक्ष्यांच्या रंगरूपाबद्दल कल्पना येईल.

**शै. साधने:** पाठात दिलेल्या चित्रांव्यतिरिक्त इतर पक्ष्यांची आकर्षक चित्रे जमवावीत. पिसारा उभारून उभ्या असलेल्या मोराचे चित्र मिळवावे.
शक्यतो संगणकाचा वापर करून विविध चित्रे दखवा-वीत.

**शब्दसंग्रह:** पक्षी, डोडो, कोंबडा, बदक, कबूतर, मैना, बुलबुल, मोर, कावळा, चिमणी
पंख, चोच, तुरा, पिसारा, दाणे इत्यादि.

**वाक्यरचना:** हा पोपट आहे. पोपट एक पक्षी आहे. हे बदक आहे. बदक तुरू तुरू चालते. ही चिमणी आहे. चिमणी चिवचिव करते. चिमणी दाणे टिपते.

मोर एक सुंदर पक्षी आहे.
कोंबडा सकाळी आवरतो. कोंबडी अंडी घालते.

**अ. सूचना:** पोपटाचे आकर्षक चित्र दाखवून पाठ परिचय करून द्यावा.

नंतर एकामागून एक अशा रीतीने इतर पक्ष्यांची ओळख करून त्यांच्या विषयी मुलांना माहिती द्यावी. या माहितीत त्या पक्ष्यांचे आकार, रंग इत्यादींचा समावेश असावा. पक्ष्यांचे भक्ष, खाऊ व राहणी यांविषयी पाठात माहिती यावी. पक्ष्यांच्या आवाजांविषयी चर्चा करावी. मुलांना आपल्या आवडत्या पक्ष्याविषयी बोलावयास उत्तेजित करावे. पक्ष्यांची हत्या न करण्याचा मुलांना आवर्जून संकेत करावा.

**अ. उपक्रम** :मुलांना पक्ष्यांची चित्रे असलेली कात्रणे मिळवून आणा-वयास सांगावीत.

मुलांना एक दोन पक्ष्यांचे सुलभ आवाज काढावयास लावावेत.

चिवचिव चिमणी आली अंगणी हे बडबड गीत मुलांना शिकवावे.

## बडबड गीत

| | |
|---|---|
| चिव चिव चिमणी | आली अंगणी |
| बघा हळूच | मारते चोच |
| दाणे टिपते | नाच नाचते |
| चिवचिव करते | पटकन उडते |
| वाजवा टाळी | बघा पळाली |

## घटक ११ वा : पाणी

**साध्य** :मुलांना आपल्या जीवनातील " पाणी " या मुख्य बाबीची ओळख होईल.
त्यांना पाण्याचे महत्त्व कळेल.
मुले पाण्याचा योग्य वापर करायला शिकतील.
त्यांना पाण्यापासून होणाऱ्या पेयांची नावे कळतील.

**शै. साधने** :पुस्तकातील चित्रांव्यतिरिक्त ज्यांमुळे पाण्याचा निर्देश हाईल अशा तऱ्हेची काही चित्रे मिळवावीत.

**शब्दसंग्रह** :पाणी, नळ, जलाशय, तलाव, नदी, पाऊस, ढग, समुद्र.
फालुदा, चहा, कॉफी, जूस, पेपसी, बाटली.
मळके, स्वच्छ, गरम, गार, थंड.
उकळणे, धुणे, पिणे, मळणे.

**वाक्यरचना** :हा जलाशय आहे. जलाशयात पाणी आहे. हा नळ आहे. नळातून पाणी पडते. ही बाटली आहे. बाटलीत स्वच्छ पाणी आहे.

ही नदी आहे. नदीचे पाणी स्वच्छ   आहे. नदीचे पाणी मळके आहे. आम्ही स्वच्छ पाणी पितो. आम्ही मळके पाणी पित नाही.
आई नळाचे पाणी उकळतो. आई पाण्याने चहा/ कॉफी/ जूस करते. आई सैपाक करताना पाणी वापरते. आम्ही पाण्याने आंघोळ करतो.

**अ. सूचना** :पुस्तकातील चित्रे दाखवून " पाणी "या घटकाची प्रस्तावना करावी. पाऊस पडतानाचे चित्र दाखवून पावसामुळेच आपल्याला पाणी मिळते ही गोष्ट मुलांच्या लक्षात आणून द्यावी. पाऊस पडल्यावर नदी नाल्यांचे पाणी जलाशयात येते. पण ते पिण्यास योग्य नसते म्हणून ते शुद्ध करून नळाद्वारे आपल्याकडे पोचवले जाते. ह्या गोष्टी मुलांच्या नीट लक्षात आणून द्याव्यात. पाण्याचा उपयोग पिण्यासाठी त्याचप्रमाणे सैपाक करण्यासाठी, धुणी धुण्यासाठी, आंघोळ करण्यासाठी व शेतीच्या आणि कारखान्यांच्या कामांसाठी कसा केला जातो व पाणी माणसाला आपले स्वास्थ्य राखण्यासाठी किती मदत करते यांविषयीची सोप्या भाषेत माहिती देऊन आपली उद्दिष्टे साधून घ्यावीत. पाणी फार महत्त्वाचे असते पाण्यावाचून जगूच शकणार नाही

आणि म्हणूनच पाणी वाया जाऊ न देता पाण्याचा नेहमी सदुपयोग करावा अशी शिकवण द्यावी.

**अ. उपक्रम** :पाऊस पडत असतानाचे चित्र रेखाटायला मुलांना उत्तेजित करावे.

मुलांना नळाचे पाणी भरून वर्गातील कुंडीतल्या किंवा अंगणातल्या एका फुलझाडाला घालायला सांगावे.

मुलांना पाण्याचा निर्देश करणारी काही कात्रणे गोळा करून आणावयास सांगावीत.

" ये रे ये रे पावसा " हे गाणे मुलांना शिकवून म्हणावयास लावावे.

बडबड गीत

ये रे ये रे पावसा
तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा
पाऊस आला मोठा

ये ग ये ग सरी
माझे मडके भरी
सर आले धावून
मडके गेले वाहून

पाऊस पडला झिम् झिम् झिम्
अंगण झाले आले चिंब
पाऊस पडला मुसळधार
रान झाले हिरवेगार

## घटक १२ वा : अंक

**साध्य** :मुलांना अंकाची ओळख होईल.
ती मोजायला शिकतील.
त्यांना अंकामधील फरक कळेल.

**शै. साधने** :वर्गातील वस्तु, हातांची व बोटे मोजतील.

**शब्दसंग्रह** :एक ते दहा,
पुस्तक, पाटी, मेजे, खुर्च्या, रंगीत पेन्सिली

**वाक्यरचना** :मी मेजे मोजतो / मोजते.
वर्गात एक कपाट आहे. वर्गात दोन फळे आहेत.
वर्गात दहा मेजे आहेत. वर्गात पाच मुली आहेत.
वर्गात चार मुलगे आहेत. वर्गात नऊ मुले आहेत.
एका हातात पाच बोटे आहेत.
दोन हातात दहा बोटे आहेत.

**अ. सूचना** :शैक्षणिक साधने म्हणून वर्गातील वस्तु, हातांची व पायांची बोटे मोजून पाठाची प्रस्तावना करावी. एक

बोट, पाच बोटे व दहा बोटे असे प्रत्येक मुलांना ओळख करून द्यावी.

मुलांना विचारलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वीकारावे.

चुकीचे उत्तर दुरूस्त करून सांगावे.

वर्गातील प्रश्नोत्तराच्या कार्यात सर्व मुलांना सामील करवून घ्यावे. रंगीत पेन्सिली मेजावर ठेवून मुलांना एक ते दहा मोजावयास लावाव्यात. त्यानंतर दहा बोटे दाखवून मोजावयास लावावेत.

विविध चित्रे दाखवून मुलांना अंक भरायला लावावेत.

घोडा, कुत्रा, गाय ह्या जनावरांना किती पाय असतात, किती डोळे, कान, शेपूट इत्यादि असते हे सांगावयास लावावे. तसेच पक्ष्यांना किती पाय व किती पंख असतात हे सांगावयास लावावे.

बस, गाडी, सायकलींच्या किती चाकी असते हे सांगाव -यास लावावे.

एका आठवड्यात किती दिवस असतात. इत्यादि हे कार्य वर्गातील प्रत्येक मुलाला करता येईल अशी खबरदारी घ्यावी.

**अ. उपक्रम** :मुलांना एका हाताच्या पाच बोटांचे ठसे कागदावर काढावयास लावावे.

मुलांना १ ते १० मोजून दाखववावयास लावावे.

***MGI*** *ने तयार केलेल्या* ***cd*** *मधील " एक आणि एक होतात दोन चला मुलांनो शिकायला " हे गीत ऐकायला व गायला लावावे.*

घड्याळातील वेळ सांगणारे / दर्शविणारे अंक वाचायला लावावे.

गोट्या किंवा डोमिनोचा प्रयोग करावा.

चला मोजायला

एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला.......

शून्य आणि एक होतात एक
माकडावर तू दगड फेक (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि एक होतात दोन
शाळेची घंटी वाजवील कोण ? (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि दोन होतात तीन
गाढवा पुढे कोण वाजवील बीन (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि तीन होतात चार
रामाने मारले रावणाला ठार (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि चार होतात पाच
दगडाने मारशील फुटेल काच (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि पाच होतात सहा
गणपती बाप्पा आला पाहा (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि सहा होतात सात
भिजू नये कोणी पावसात (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि सात होतात आठ
घरो घरी होती हरीचा पाठ (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि आठ होतात नऊ
चोराला पाहून नको भिऊ (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

एक आणि नऊ होतात दहा
फुललेली सुंदर फुले पहा (२)
एक ते दहा शिकायला मोजायला
चला मुलांनो शिकायला......

## घटक १३ वा : हवामान

**साध्य** मुलांना हवामानाविषयी माहिती मिळेल.

**शै. साधने** :हा घटक यशस्वी होण्याकरिता त्याच्याशी संबंधित आकर्षक चित्रे मिळवावीत.

**शब्दसंग्रह** :ऊन, पाऊस, वारा, ढग, छत्री, रेनकोट, टोपी,
रबरीबूट,
जाकीट, काळा चष्मा, पतंग,
समुद्र, वाळू, नाव
खेळणे, भिजणे, खाणे, पिणे, पोहणे, उडवणे, वापरणे

**वाक्यरचना** :आज दिवस उन्हाळा / पावसाळा आहे.
आकाश ढगाळ / निळे आहे.
मी पावसात / उन्हात छत्री वापरतो / वापरते.
आज वाऱ्याचा दिवस आहे.
दादा पतंग उडवतो.
हा समुद्र आहे. आम्ही समुद्रात पोहतो.

**अ. सूचना** :हवामानासंबंधित एखादे चित्र दाखवून " आकाश ढगाळ आहे." असे म्हणून त्या चित्राची ओळख करून द्यावी.

या चित्रात काय काय पाहावयास मिळाले म्हणून सुटसुटे प्रश्न विचारून त्यांच्या निरिक्षणात आलेल्या चित्रांतील वस्तुंची नावे त्यांना सांगावयास लावावीत. ती पूर्ण वाक्यांत स्विकारावीत. आलेल्या व्यक्तींवर व त्यांच्या कृतींवर भर द्यावा. शैक्षणिक साधने म्हणून सुचवलेल्या चित्रांवर चर्चा करून मुलांच्या ज्ञानात भर घालावा.

**अ.उपक्रम** :वर्गात चित्रवाचनासाठी उपयोगी पडतील अशी आकर्षक चित्रे मुलांना मिळवून आणावयास लावावीत.

## घटक १४ वा : फुलबाग

**साध्य** :मुलांना फुलबागेविषयीची ओळख होईल.
त्यांना बाग, फुले, अवजारे आणि रंगांविषयी माहिती मिळेल पूजेच्या वेळी, लग्नात, फुलांचा कितपत उपयोग होतो हे त्यांना कळेल.
घरात सजाविण्यासाठी फुलांचाही उपयोग होतो हे त्यांना कळेल.

**शै. साधने** :हा घटक यशस्वी होण्याकरिता त्याच्याशी निगडित आकर्षक चित्रे मिळवावीत.
शक्य झाल्यास ताजी फुले बरोबर घ्यावीत.

**शब्दसंग्रह** :गुलाब, झेंडू, चाफा, जास्वंद, चमेली, कमळ
झारी, खुरपे, कुदळ
रंग : लाल, गुलाबी, पिवळी, पांढरी, जांभळी, हिरवी पाने
माती खणणे, रोपटे लावणे, पाणी घालणे, गवत उपटणे, फुले तोडणे / वेचणे

**वाक्यरचना** :ही फुलबाग आहे. ही फुले आहेत.
फुलबागेत सुंदर फुले आहेत.
कमळ एक फुल आहे.
माळी बागेत काम करतो.
माळी झारीने फुलांना पाणी घालतो.
गुलाबाचे झाड काटेरी आहे.

**अ. सूचना** :बरोबर आणलेली रंगीबेरंगी फुले अथवा फुलांची आकर्षक चित्रे मुलांना दाखवून पाठ परिचय करून घ्यावा. नंतर फुलांच्या आधारे एकामागून एक अशा फुलांची ओळख करून द्यावी. पाठ घेत असताना फुलांचे आकार, रंग, सुगंध, व उपयोग यांबद्दल चर्चा करावी.

फुले झाडावर, रोपट्यांवर, वेलींवर लागतात ही गोष्ट मुलांच्या ध्यानात आणून द्यावी. फुलांनी काय काय तयार करतो. उदाः हार, गुच्छ, फुलदाणीत सजवणे, भेट वस्तु म्हणून देतो इत्यादि माहिती त्यांच्या कुवती अनुसार द्यावी.

**अ.उपक्रम** :मुलांना आपल्या आवडत्या फुलाचे चित्र काढावयास लावावे.

मुलांना वेगवेळ्या फुलांची नावे सूचवून कागदावर त्यांची चित्रे काढावयास सांगावीत.

नंतर त्या चित्रांना रंग देऊन कातरीने ती नीट कापून घ्यावी.

मग ती चित्रे एका फलकावर चिकटवून वर्गात लावावा.

## घटक १५ वा : न्याहारी

**साध्य** :हा पाठ शिकवल्यावर न्याहारीच्या वेळी जे खाद्य पदार्थ व वापरलेल्या वस्तू लागतात मुलांना त्यांची नावे सांगता येतील.
त्यांना खाद्य पदार्थांची चव कळेल.
मुले आपल्या आवडी निवडी दर्शवू शकतील.

**शै. साधने** :हा घटक यशस्वी होण्याकरिता त्याच्याशी निगडित आकर्षक चित्रे मिळवावीत.

**शब्दसंग्रह** :ग्लास, कप - बशी, सुरी, चमचा, चहादाणी,
दूध, चहा, कॉफी, पेय, सरबत
पाव, लोणी, साखर, मुरंबा, फळे, बिस्कीट
गोड, गरम, कोमट, गार
पिणे, कापणे, वाढणे, ओतणे, ढवळणे, घेणे, खाणे

**वाक्यरचना** :केशव चहा पितो. केशव गरम चहा पितो.
केशव पाव लोणी खातो.
कपात दूध आहे. दूध गरम आहे.
मुरंबा गोड आहे. आई सुरीने पाव कापते.

**अ. सूचना** :पुस्तकातील चित्रावर संभाषण करून पाठाचा परीचय करावा. शिक्षकाने मुलांना खाद्य पदार्थांची नावे सांगावीत.

**अ.उपक्रम** :मुलांना कप, चमचा, काटा, ग्लास, इत्यादींची चित्रे काढावयास उत्तेजित करावे.
शक्य असेल तर भातुकलीचे खेळ किंवा मासिकांमधून सैपाकघरातील वस्तुंची सुंदर कात्रणे गोळा करावयास मुलांना आणावयास प्रोत्साहन द्यावे.

## घटक १६ वा : चित्रवाचन

**साध्य** :मुले निरनिराळ्या प्रसंगांच्या चित्रांचे निरीक्षण करावयास शिकतील.
ती चित्रांतील प्रसंगातील वर्णन करावयास शिकतील.
मुलांना बऱ्याच नवीन शब्दांची ओळख होईल.

**शै. साधने** :पाठ्यपुस्तकात दिलेल्या चित्रांव्यतिरिक्त चित्रवाचन या विषयाचा मुलांना चांगला सराव होण्याकरिता निरनिराळ्या प्रसंगांची इतर आकर्षक चित्रे मिळवावीत.

**शब्दसंग्रह** :पेलीकन क्रॉसिंग, मोटार, बस, फटफटी, सायकल
सिग्नल लाईट, लाल, पिवळा, हिरवा, पोलीस, रस्ता,
ओलांडणे, पाहणे, उजवा - डावा - उजवा बाजू
पाहणे, सावध होणे
झाड, आंबे, पक्षी, फुले, मांजर, रंगीबेरंगी, उडणे

**वाक्यरचना** :हा क्रॉसिंग आहे. ही मोटार आहे.
पोलीस सिग्नल देतो. मुले रस्ता ओलांडतात.
मुले शाळेला जातात.

झाडावर आंबे आहेत. एक मुलगा झाडाखाली आहे. फुले रंगीबेरंगी आहेत. मांजर झाडाखाली बसते.

**अ. सूचना** :मुलांना चित्रांचे नीट निरीक्षण करावयास लावावे. मुलांना ह्या चित्रांत काय काय पाहावयास मिळाले ? असा प्रश्न विचारून त्याच्या निरिक्षणात आलेल्या चित्रातील वस्तुंची नावे त्यांना सांगावयास लावावीत. प्रश्नांची उत्तरे स्वीकारताना ती पूर्ण वाक्यांतच स्वीकारावीत एका मुलाने दिलेले उत्तर इतर मुलांकडून म्हणून घ्यावे.

चित्रवाचन करीत असताना चित्रात आलेल्या व्यक्तींवर व त्यांच्या कृतींवर भर द्यावा.

**अ.उपक्रम** :वर्गात चित्रवाचनाकरिता उपयोगी पडतील अशी आकर्षक चित्रे मुलांना मिळवून आणावयास लावावीत.

## घटक १७ वा : वाढदिवस

**साध्य** :हा पाठ शिकवल्यावर वाढदिवसाच्या वेळी जे खाद्य पदार्थ व वापरलेल्या वस्तु लागतात, त्यांची नावे मुलांना सांगता येतील.

**शै. साधने:** हा घटक यशस्वी होण्याकरिता त्याच्याशी निगडित आकर्षक चित्रे मिळवावीत.

**शब्दसंग्रह** :थंड पेय, जूस.
कागदी वस्तु ग्लास व ताट, सुरी,
खाद्य पदार्थ : केक, समोसे, विस्किटे, लाडू, गोळ्या.
सजावती वस्तु : रंगीबेरंगी फुगे, फुलांचा गुच्छ, टोप्या मेणबत्ती, भेटवस्तु.

कापणे, फुंकरणे, खाणे, पिणे, खेळणे, हसणे, नाचणे, टाळ्या वाजवणे, शुभेच्छा देणे.

**वाक्यरचना** :हा दिवाणखाना आहे. हा केक आहे. ही मेणबत्ती आहे. ही टोपी आहे.

उमा मेणबत्ती फुंकरते. उमा केक कापते.
मुले नाचतात / खेळतात / हसतात / टाळ्या वाजवतात

**अ. सूचना** :पुस्तकातील चित्रावर संभाषण करून पाठाचा परीचय करावा.

**अ.उपक्रम** :मुलांना दिवाणखाना , मेणबत्ती, टोपी, केक, थंडपेय इत्यादींची चित्रे काढावयास उत्तेजित करावे.
शक्य असेल तर मुलांना स्वतःचा एक फोटो आणावयास प्रोत्साहित करावे.

*MGI ने तयार केलेल्या* ***cd*** *मधील " **आजोबांच्या वाढदिवसाला, आज जमले सारे** " हे गीत ऐकायला व गायला लावावे.*

## वाढदिवस

आजोबांच्या वाढदिवसाला, आज जमले सारे (२)
आई बाबा मामा मामी, मावसा मावशी एकूण सारे
टाळ्या वाजवून एकमुखाने, म्हणाले सारे आजोबाला
अभिनंदन वाढदिवसाचे अभिनंदन

आजोबाला झाले आज साठ वर्ष (२)
किती किती होतो आम्हा साऱ्यांना हर्ष (२)
टाळ्या वाजवून एकमुखाने, म्हणाले सारे आजोबाला
अभिनंदन वाढदिवसाचे अभिनंदन

अभ्यास असो वा खेळ असो, आजोबासंगे आम्ही (२)
बघता बघता उरकून काम, भजनाला बसतो आम्ही (२)
टाळ्या वाजवून एकमुखाने, म्हणाले सारे आजोबाला
अभिनंदन वाढदिवसाचे अभिनंदन

राग नाही न द्वेष कधी, नाही कटू वचन (२)
प्रेमे भावी आम्हा पाही, एवढे मोठे त्याचे मन (२)
टाळ्या वाजवून एकमुखाने, म्हणाले सारे आजोबाला
अभिनंदन वाढदिवसाचे अभिनंदन